दैनिक हेराल्ड | गोवा | मंगळवार, ८ एप्रिल २०२५ | 3

निवडक



सातोडे – केरी : झाडीत अडकलेला ट्रक.

## सातोडे – केरी येथे भाजीवाहू ट्रकला अपघात

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. ७** : सातोडे – केरी येथे भाजीवाहू ट्रकला आज सोमवारी सकाळी साडे सहाच्या सुमारास स्वयं अपघात झाला.सुदैवाने या अपघातात कुणालाही इजा झाली नाही. यासंबंधी सविस्तर माहिती अशी की सदर भाजीवाहू ट्रक (के. ए. २२ ए. ए. ५५७८) सकाळी फोंड्याहून केरी मार्गे जात असता अचानक ड्रायव्हरचे गाडीवरील नियंत्रण सुटले व ट्रक उजव्या बाजूला झाडीत अडकला. ट्रक मध्ये वाहकही होता. ट्रकचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. सुदैवाने रस्त्याच्या बाजूला कोणी नव्हते. सकाळची वेळ असल्याने गाड्यांची वर्दळही नव्हती. त्यामुळे अनर्थ टळला.

---

## हरमल पंचायतीची १३ रोजी ग्रामसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७** : येथील पंचायत ग्रामसभा रविवार दि. १३ रोजी सकाळी १० वाजता पंचायत सभागृहात घेण्यात येईल, असे सरपंच अनुपमा मयेकर यांनी सांगितले. या ग्रामसभेसमोर कोणासही लेखी सूचना व ठराव मांडावयाचे असल्यास मंगळवार ८ पर्यंत पंचायत कार्यालयात सादर करण्याचे आवाहन केले आहे. या ग्रामसभेत मागील वृत्तांत वाचून कायम करणे योजना लाभार्थीची ओळख,बायो डायवरसीटी व्यवस्थापन कायदा, फॉर्म १० वर चर्चा, प्रशासकीय अहवाल,अंदाजपत्रकास मान्यता तसेच ग्रामस्थांकडून आलेल्या विषयावर चर्चा करण्यात येईल. तरी ग्रामस्थांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच अनुपमा मयेकर यानी केले आहे.
दरम्यान, माननीय न्यायालयाने जारी केलेल्या गोव्यातील प्रमुख व एमडीआर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी असलेल्या कायदेशीर, बेकायदेशीर बांधकामाबाबत गरमागरम चर्चा होण्याची शक्यता असल्याने सर्वांचे ग्रामसभेकडे लक्ष लागून राहिले आहे.

---

## अस्नोडा भागात ९ रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ७** : ११ केव्ही अस्नोडा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. ९ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत गणेशनगर, खोरीवाडा, पाईप फॅक्टरी, सेंट क्लारा चर्च अस्नोडा आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.
त्याचप्रमाणे ११ केव्ही कासारपाल फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. १० रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत कुमयामळ, साळ पुर्नवसन आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

## कुडतरी भागात आज, उद्या खंडित वीजपुरवठ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८** :११ केव्ही मंडोपा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. ८ : रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत आके – बायक्सो, शांतीनगर, मांडोपा चार रस्ते, मांडोपा मैदान, मोड्डी, शनी मंदिर, ब्लास्को हॉल, मोडाभाट, पाद्रे पीओ, धर्मापूर, फ्राडले, बेले, क्रूझनगर, रेवोडा, कालवाडो, डोंग्री, शिरोडकर भागात, मांडोप पूल भागात आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.
त्याचप्रमाणे कुडतरी विराभाट जुना डीटीसी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. ९ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मारिया बार जवळील भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

## वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८** : सुमित (सुमित शिवम) टी/सी आणि कल्पना टी/सीरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने ९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सदर फोंडा, कल्पना आइस्क्रीम जवळील भागात आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.
त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने दि. १० रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत फोंडा पोलिस स्टेशनजवळ, गोवा स्टेट बँकेजवळ आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

## डिचोली येथे प्रधानमंत्री राष्ट्रीय अप्रेंटीसशीप मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७** : गोवा सरकारच्या कौशल्य विकास आणि उध्योजकता संचालनालयाने दि. १६ रोजी उत्तर गोव्यातील डिचोली येथील सरकारी औध्योगिक प्रशिक्षण संस्थेत सकाळी ९ वाजल्यापासून प्रधानमंत्री राष्ट्रीय अप्रेंटीसशीप मेळाव्याचे आयोजन केले आहे. अप्रेंटीसशीप मेळाव्यात अनेक सार्वजनिक आणि खाजगी अस्थापने सहभागी होण्याची अपेक्षा आहे. इच्छुक आयटीआय उमेदवारांनी आणि इतर स्थानिक युवकांनी नावनोंदणी आणि आपले भविष्य घडविण्यासाठी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी सकाळी ९ वाजता मेळाव्याच्या ठिकाणी हजर राहावे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी सरकारी औध्योगिक प्रशिक्षण संस्था, डिचोली, दूरध्वनी क्रं. ०८३२–२३६२३१५, ७०२००५३०५२ वर संपर्क साधावा.

---

## वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ८** : कॉस्ता फॅक्टरी आणि केरकर हॉस्पिटल ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. ८ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत पॅलासिओ रॉड्रिग्ज विंग –बी, जोशी पेपर्स, सीताराम रेसिडेन्सी, रौल हॉस्पिटलजवळील होम मेड लंच, जीसी अपार्टमेंट्स, भारत आर्ट, रॉयल हॉस्पिटल आणि वेनस्टा क्लासिक इमारत, कोस्टा फॅक्टरीच्या मागे प्रियांका एन्क्लेव्ह को–ऑप आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.त्याचप्रमाणे केरकर हॉस्पिटल आणि कॉस्ता फॅक्टरी ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. ९ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत कॉस्ता फॅक्टरीच्यामागे, क्लासिक बिल्डिंग, सीडी पटांगा सिमा बिल्डिंगजवळील शिव पार्वती, सीडी पटांगा बिल्डिंगसमोरील भाग, भागारती ग्लास, कासा डी ट्रॅव्हस्को बंगला आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

# नवीन शैक्षणिक वर्ष सुरू ; पालकांची निदर्शने

### मे महिन्यात उन्हाळी सुट्टी मिळणार | एनईपीची अंमलबजावणी घाईगडबडीत

■ टीम दैनिक हेराल्ड




**पणजी, दि. ७** : गोव्यात नवीन शैक्षणिक दिनदर्शिकेच्या अंमलबजावणीनुसार ७ एप्रिल रोजी इयत्ता सहावी ते दहावी तसेच बारावीच्या शाळा पुन्हा सुरू झाल्या. या बदलामुळे राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण परिवर्तन झाले आहे. शैक्षणिक वर्ष आता ७ एप्रिलपासून सुरू होईल आणि जुन्या व नवीन शैक्षणिक वर्षांदरम्यान एक आठवड्याची विश्रांती असेल. तसेच, राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २020 च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मे महिन्यात उन्हाळी सुट्टीही मिळणार आहे.

तथापी, विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक सत्राला सुरुवात होत असताना, काही पालकांनी शिक्षण संचालनालयाच्या बाहेर मूक निदर्शने करत सरकारच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. या पालकांनी आरोप केला की, एनईपीची अंमलबजावणी घाईगडबडीत आणि पुरेशा नियोजनाविना करण्यात आली आहे.

आम्हाला राष्ट्रीय शिक्षण धोरण किंवा शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांविरोधात कुठलाही आक्षेप नाही. मात्र, या बदलांबाबत कोणताही खुला संवाद साधला गेला नाही. कोणत्याही भागधारकांच्या बैठका झाल्या नाहीत. अशा टॉप–डाउन अंमलबजावणीमुळे हजारो विद्यार्थी आणि शिक्षकांवर विपरीत परिणाम होत आहे, असे एका निषेध करणाऱ्या पालकाने सांगितले.

शैक्षणिक दिनदर्शिकेतील या बदलांविरोधात सुमारे ३९० शाळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुख्याध्यापक संघटनेने तसेच ७,००० हून अधिक शिक्षकांनी आक्षेप नोंदवला होता, मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप निदर्शकांनी केला आहे.

एनईपीमध्ये शैक्षणिक वेळापत्रकात मूलभूत बदल करण्याची आवश्यकता नसल्याचा युक्तिवाद करत टीकाकारांनी सरकारवर धोरणाचा चुकीचा अर्थ लावल्याचा आरोप केला आहे. याशिवाय, अभ्यासक्रमाच्या स्वरूपावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. विशेषतः, नव्या अभ्यासक्रमांतर्गत इयत्ता सहावीतील हिंदी पाठ्यपुस्तकांचा स्तर नववीच्या विद्यार्थ्यांसाठी असावा इतका अवघड असल्याचे काही पालकांचे म्हणणे आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी अतिशय जड आणि अवास्तव गतीने पुढे नेण्यात आला आहे. यातील मजकूर त्यांच्या वयोगटाशी सुसंगत नाही, असे एका पालकाने स्पष्ट केले. राज्यातील शिक्षण प्रशासनाने या आक्षेपांवर कोणती भूमिका घेणार आणि पुढील टप्प्यात कोणते निर्णय घेतले जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# सासष्टी येथील शेतकऱ्यांची भाताच्या आधारभूत किमतीत वाढीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७** : शेतीसाठी वाढत्या खर्चाचा भार झेलत असलेल्या सासष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांनी भाताच्या आधारभूत किमतीत भरीव वाढ करण्याची मागणी केली आहे. सध्याची हमीभाव २२ रुपये प्रतिकिलो असून तो अत्यंत अपुरा असल्याचे सांगत शेतकऱ्यांनी ही किंमत ४० ते ५० रुपये प्रति किलोपर्यंत वाढवावी, अशी मागणी केली आहे.

कुडतरी येथील शेतकरी मिलाग्रेस मेनेझेस यांनी पत्रकारांशी संवाद साधताना शेतीशी संबंधित वाढत्या खर्चावर प्रकाश टाकला. मजुरीचे शुल्क दिवसेंदिवस वाढत आहे, तसेच इतर लागवडीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत केवळ २२ रुपये प्रति किलो ही किंमत शेतकऱ्यांसाठी अजिबात परवडणारी नाही, असे त्यांनी सांगितले.

स्थानिक आमदार रेजिनाल्ड यांनी शेतकऱ्यांच्या या मागणीला पाठिंबा दिला असून, कापणी यंत्रे व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचेही कौतुक करण्यात आले. आमदारांनी दिलेल्या मदतीमुळे शेती टिकून राहिली असली तरी, केवळ सुविधा पुरवून प्रश्न सुटणार नाहीत. भाताच्या हमीभावात वाढ झाली नाही, तर अनेक शेतकरी शेती सोडण्याच्या मार्गावर आहेत, असे मेनेझेस यांनी नमूद केले.

या मागणीला आणखी एक स्थानिक शेतकरी विन्सेंट डिसोझा यांनीही दुजोरा दिला. शेतकऱ्यांना टिकवायचे असेल तर सरकारने तातडीने आर्थिक मदत व हमीभाव वाढवण्याचे पाऊल उचलले पाहिजे. अनेक शेतकरी तोट्यात जात असल्याने शेतीपासून दूर जात आहेत, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

आमदार लॉरेन्को यांनी देखील सरकारकडे हमीभाव वाढवण्याची मागणी केली असून, वेळेवर अनुदान व मदत मिळणे किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित केले. फक्त हमीभाव वाढवणे पुरेसे नाही, तर ती मदत वेळेवर मिळाली पाहिजे. मी हा मुद्दा आधीच सरकारपुढे मांडला आहे आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे,असे त्यांनी स्पष्ट केले.

सासष्टी मधील शेतकऱ्यांच्या या मागणीवर सरकार सकारात्मक प्रतिसाद देते का, याकडे संपूर्ण शेती समुदायाचे लक्ष लागले आहे. वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर भात उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार का, हे लवकरच स्पष्ट होईल.

---

# मडगाव रेल्वे स्थानकावर कचऱ्यामुळे प्रवासी नाराज

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७** : कोकण रेल्वे स्थानकाच्या अलीकडेच करण्यात आलेल्या सौंदर्यीकरणाची प्रशंसा होत असतानाच, कचऱ्याच्या वाढत्या समस्येमुळे स्थानकाच्या स्वच्छतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानकाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आली असली तरी, परिसरातील कचऱ्याचा साठा हा मोठी डोकेदुखी ठरत आहे. विशेषतः नव्याने विकसित झालेल्या भागांत, जिथे अन्नपदार्थांचे स्टॉल आहेत, तेथे कचऱ्याचा अनियंत्रित साठा आढळून येत आहे.

स्थानकाला भेट दिल्यास, विशेषतः अन्नपदार्थ विक्री केंद्रांच्या आसपास कचऱ्याचे ढीग पाहायला मिळतात. यामुळे स्थानकाच्या स्वच्छतेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांनीही प्रशासनाच्या दुर्लक्षावर नाराजी व्यक्त केली आहे. अनेक नागरिकांचे म्हणणे आहे की, स्थानकाचा देखावा सुधारण्यात आला असला तरी, स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने अन्न विक्रेत्यांचे आणि प्रशासनाचे दुर्लक्ष गंभीर आहे.

आरोग्यासाठी धोकादायक ठरणारा हा कचरा स्थानकाच्या सुधारित प्रतिमेला मळवट लावत आहे. ही समस्या कोकण रेल्वे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने कारवाई केली.

सूत्रांच्या माहितीनुसार, स्वच्छता राखण्यात अपयशी ठरलेल्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, स्थानकाच्या त्वरित स्वच्छतेचे निर्देश अधिकाऱ्यांनी दिले आहेत.तथापि, स्थानिक रहिवाशांची चिंता अद्याप कायम आहे. नावेलिम येथील रहिवासी पीटर कुतिन्हो यांनी या समस्येकडे लक्ष वेधत सांगितले की, स्थानकाच्या पायाभूत सुधारणा स्तुत्य आहेत, मात्र स्वच्छतेचा अभाव हा संपूर्ण सौंदर्यीकरणावर पाणी फेरतो. त्यांनी स्थानकाची तुलना कुप्रसिद्ध सोनसोडो कचरा डेपोशी करत या स्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

मडगावचे रहिवासी रमेश शिरोडकर यांनीही चिंता व्यक्त करत सांगितले की, मडगावसारख्या महत्त्वाच्या रेल्वे स्थानकावर स्वच्छतेच्या उच्च दर्जाचा अवलंब करणे आवश्यक आहे. कचऱ्याच्या समस्येमुळे स्थानकाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते. स्वच्छ भारत अभियान आणि स्वच्छतेवरील भर देणाऱ्या धोरणांच्या पार्श्वभूमीवर, मडगाव स्थानकातील ही परिस्थिती प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरत आहे. येत्या काळात ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

---

# आगोंद येथे १८ आस्थापनांना उच्च न्यायालयाचा दिलासा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ७**: उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शनिवारी आगोंद येथे १८ पर्यटन आस्थापनांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. काणकोणचे उपजिल्हाधिकारी मधु नार्वेकर यांच्या उपस्थितीत ही सील केलेली दुकाने पुन्हा उघडण्यात आली . तर यापूर्वीच पाच आस्थापनांचे सील काढण्यात आले होते.

गेल्या महिन्यात आगोंद किनारी भागातील एकूण ६३ आस्थापनांवर बंदी घालण्यात आली होती. त्यापैकी २३ आस्थापनांना सील केल्यानंतर उर्वरित ४० आस्थापने अजूनही बंद आहेत. २०२४–२५ या पर्यटन हंगामाच्या अखेरीस ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, आवश्यक परवाने आणि कागदपत्रे उच्च न्यायालयात सादर केल्यानंतर २३ पर्यटन आस्थापनांवरील सील हटविण्यात आले आहे. शनिवारी, उपजिल्हाधिकारी मधु नार्वेकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आगोंद किनारपट्टीच्या दक्षिण भागात भेट दिली. या मोहिमेत आगोंद पंचायत सचिव अमोल के. नाईक गावकर यांच्या समवेत १८ आस्थापनांचे सील काढण्यात आले. या आस्थापनांमध्ये मुख्यतः रिसॉर्ट्सचा समावेश होता.

वीज आणि सार्वजनिक बांधकाम (पाणीपुरवठा) विभागांना, सीलबंद नसलेल्या आस्थापनांचा वीज आणि पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

उच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशानुसार, पाच आस्थापनांवरील बंदी आधीच उठविण्यात आली होती. तसेच, दोन टप्प्यांमध्ये वीज आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला होता. दरम्यान, प्रभावित व्यवसायिकांनी न्यायालयात आवश्यक परवानग्या आणि कागदपत्रे सादर करून त्यांच्या आस्थापनांचे सील काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र, अनेक आस्थापनांकडे अद्याप कोणतेही अधिकृत परवाने नाहीत. या परिस्थितीत संबंधित मालकांनी न्यायालय किंवा गोवा किनारपट्टी विभाग कडे धाव घेतली नाही. काही व्यावसायिकांनी त्यांची आस्थापने पूर्णपणे पाडून जमीन मूळ स्थितीत आणली आहे.

---

# लोलये –पोळे कोमुनिदादकडून १ लाख चौरस मीटर जमीनीचा करार

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. ७** : लोलये – पोळे कोमुनिदादने मल्लिकार्जुन मल्टीफ्रूट्स प्रोसेसिंग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड (एमएमपीपीसीएल) यांना १ लाख चौरस मीटर जमीन भाड्याने देण्याचा एकमताने निर्णय घेतला आहे. कंपनी ही जमीन विविध कृषी आणि कृषी–संबंधित उपक्रमांसाठी वापरणार आहे.

ही जमीन लोलये गावातील सर्व्हे क्रमांक ३५८/१ अंतर्गत येते. कोमुनिदादचे अध्यक्ष विश्वजित वारिक यांनी सांगितले की, या करारामुळे कंपनीला शेती उत्पादनांचे साठवणूक, प्रक्रिया, पॅकिंग आणि विपणन सुलभ होणार आहे. हा उपक्रम प्रामुख्याने काणकोण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादनांच्या योग्य व्यवस्थापनावर लक्ष केंद्रीत करणार आहे.

मल्लिकार्जुन मल्टीफ्रूट्स प्रोसेसिंग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड या कंपनीने या जागेवर फणस, नारळ, हळद, आंबा, काजू, दुग्धव्यवसाय, केळी लागवड व प्रक्रिया तसेच कोकम प्रक्रिया यासारख्या विविध प्रक्रिया युनिट्स उभारण्याचा प्रस्ताव दिला आहे.

या कराराबाबत बोलताना अध्यक्ष वारिक म्हणाले, या प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यांना त्यांच्या उत्पादनांवर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करता येईल आणि योग्य बाजारभाव मिळेल.

रविवारी सकाळी केशव देवालय, लोलये येथे झालेल्या असाधारण सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. सभेसाठी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, तसेच पात्र कोमुनिदाद सदस्यांनाच उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली होती.

कोमुनिदाद सूत्रांनी सांगितले की, कंपनीने २०२२ मध्ये या जमिनीची मागणी केली होती. आवश्यक प्रक्रियेनंतर फायली मंजुरीसाठी कोमुनिदादकडे सादर करण्यात आल्या. हा भाडेपट्टा २० वर्षांसाठी देण्यात आला असून तो नूतनीकरण करता येऊ शकतो. भाडेपट्टा प्रचलित बाजारभावानुसार आकारला जाणार आहे.

---

# सुकूर येथील २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची चौकशी होणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७** : मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने बार्देश येथील उपजिल्हाधिकाऱ्यांना सुकूर गावातील २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंबंधी चौकशी पूर्ण करून सहा महिन्यांच्या आत उत्तर गोवा जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. अहवालाच्या आधारे संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

सुकूर येथील रहिवासी नीलेश चारी यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर सुनावणी करताना, न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठाला आढळून आले की, २० कलमी कार्यक्रमाचा गैरवापर झाला असून अनेक अतिक्रमणे तसेच परवानगीशिवाय किंवा अनुमतीपेक्षा जास्त बांधकामे झाल्याचे आढळले आहे.

बार्देश उपजिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले की, २० कलमी कार्यक्रमांतर्गत पात्र लाभार्थ्यांना १०० चौरस मीटर पर्यंत जमीन दिली जाते. तथापि, जर कोणत्याही लाभार्थ्याने यापेक्षा मोठे बांधकाम केले असेल, तर अतिरिक्त ५० चौरस मीटरपर्यंतची जागा दंड भरून नियमित करण्याचा विचार झाला होता.

याबबतचा पहिला अहवाल १९७१ मध्ये भूमी अभिलेख निरीक्षक, म्हापसा यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार मूळ भूखंडांची नोंद दर्शवतो. तर दुसरा अहवाल ८ ऑक्टोबर २०२४ रोजी बार्देश तालुका मामलतदार आणि सुकूर पंचायतीच्या तलाठ्यांनी तयार केला, जो सद्यस्थितीतील बांधकामांची माहिती प्रदान करतो.

उपलब्ध अहवालांवरून असे दिसून आले की २० कलमी कार्यक्रमांतर्गत केवळ ३१ वाटप अधिकृतरीत्या मंजूर करण्यात आली होती. मात्र, सुकूर गावातील सर्व्हे क्रमांक १२/१ वर सध्या ६७ बांधकामे अस्तित्वात आहेत. तसेच, ९ भूखंड मूळ वाटपधारकांच्या कुटुंबांनी व्यापले असून उर्वरित भूखंड व बांधकामे अनधिकृत असल्याचे आढळले.

राज्याचे महाधिवक्ता देविदास पांगम यांनी न्यायालयाला कळवले की, सरकारला या गैरप्रकाराची पूर्ण कल्पना आहे आणि त्यामुळे बार्देश उपजिल्हाधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करण्यात येणार आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करत योग्य स्थळ तपासणी, सर्वेक्षण आणि आवश्यक नोंदींची पडताळणी केल्यानंतर अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जाईल. तसेच सुकूर गावातील अनधिकृत निवासी बांधकामांचा मुद्दा महत्त्वाचा असल्याने, संबंधित अधिकाऱ्यांना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ देण्यात येईल.

दरम्यान, अधिकाऱ्यांनी गेल्या आठवड्यात याचिकाकर्त्याचे अतिक्रमण पाडले. याचिकाकर्त्याने आरोप केला आहे की, एका मंत्र्याने राजकीय सूडबुद्धीने त्यांचे घर पाडण्याचे आदेश दिले. न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, पुढील सहा महिन्यांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करावा आणि त्यानंतर दोषींवर योग्य ती कारवाई केली जावी.

---

# मडगाव शहरात भिक्षेकऱ्यांची वाढती समस्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७** : मडगाव शहरात भिक्षेकऱ्यांची संख्या वाढत असून, सार्वजनिक ठिकाणी त्यांची सततची उपस्थिती नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. बाजारपेठ, बसस्थानक, वाहतूक जंक्शन आणि इतर वर्दळीच्या ठिकाणी हे भिक्षेकरी सर्रास दिसून येत असून, यामुळे स्थानिक रहिवासी, पर्यटक आणि व्यापाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

नागरिकांच्या मते, या समस्येने शहराच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होत आहे. मडगावमध्ये भिक्षेकऱ्यांची संख्या नियंत्रणाबाहेर गेली आहे. काही जण खरोखर गरजू असतील, मात्र सार्वजनिक ठिकाणी मागणी करण्याचे प्रमाण वाढले असून, त्यामुळे रहिवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे, असे एका स्थानिक दुकानदार रियाज शेख यांनी सांगितले.

भिक्षेकऱ्यांच्या वाढत्या संख्येमुळे सुरक्षितता आणि स्वच्छतेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. काही जण आक्रमक वर्तन करतात, तर काही अस्वच्छ अवस्थेत असल्याने आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, अनेक ठिकाणी रस्ते व इमारतींचे प्रवेशद्वार अडवल्याचेही नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे.

यासंदर्भात वारंवार मागणी करूनही, प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. मडगाव नगरपरिषद व स्थानिक पोलिसांनी समस्येची दखल घेतली असली, तरी अद्याप प्रभावी उपाययोजना झालेली नाही.

या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी भिक्षेकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस योजना आणि भिक्षाविरोधी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे,असे दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

शहरातील नागरिकांना आशा आहे की प्रशासन लवकरच भिक्षेकऱ्यांच्या वाढत्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देईल, तसेच गरजूंसाठी पुनर्वसन उपाययोजना राबवून सार्वजनिक ठिकाणांवरील अडथळे दूर करण्यासाठी ठोस पावले उचलले जातील.